# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
दाखल झालेले अपील

## क्र.मुमाआ/नों.क्र.५७८५ / २२ /अ.क्र.२७६९ /२५

श्रीमती तृप्ती मिलिंद धोंडे
अ-२/६, जीवन नगर, मिठागर रोड,
मुलुंड पूर्व, मुंबई-४०००८१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कमला मेहता
अंध हायस्कुल, डॉ. दादासाहेब फाळके रोड , दादर पूर्व, मुंबई-४०००१४.

प्रथम अपिलीय अधिकारी, कमला मेहता अंध हायस्कुल,
डॉ. दादासाहेब फाळके रोड , दादर पूर्व, मुंबई-४०००१४.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०४.२०२६**

अपीलकर्ता — उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी — अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी — अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०७.२०२२ | -- | २४.०८.२०२२ | -- |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या प्रस्तुत द्वितीय अपील अर्जात त्यांनी दाखल केलेल्या दि.१२/०७/२०२२ रोजीच्या जोडपत्रानुसार त्यांचे दिनांक ०६/०७/२०२२ रोजीच्या पत्रास अनुसरून दिनांक २९/०६/२०२२ रोजीचा बालसंगोपन रजा मंजुरी बाबतचा अर्ज नामंजूर केल्याप्रकरणी शासन परिपत्रक नियम मंजुरीचे अधिकार व कार्यकक्षे बाबत प्रस्तुत माहिती मिळणे बाबत मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी, कमला मेहता, अंध हायस्कूल, दादर (पूर्व), मुंबई-१४ येथे अर्ज दाखल केला असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी विहित मुदतीत कुठलाच प्रतिसाद दिला नसल्याचे नमूद करीत दि.२४/०८/२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज हा अपिलीय अधिकारी, कमला मेहता अंध हायस्कूल, दादर यांच्याकडे दाखल केला होता. त्यानंतर प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दि.११/१०/२०२२ रोजी दाखल केलेला आहे.

याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीस प्राधिकरणातर्फे कोणीही उपस्थित नाही. तथापि, अपिलार्थी स्वतः तसेच अपिलार्थीच्या वतीने ॲड.दिपाली देहेरकर या हजर असून त्यांनी अपिलार्थीचा बालसंगोपन अर्ज हा कुठल्याही कारणाशिवाय दि.०६/०७/२०२२ रोजी शालेय समितीचे सचिव श्री.हरीश शहा यांनी नामंजूर केला

असल्याचे व कुठलीही कारणमीमांसा नसलेले पत्र अपिलार्थींना प्राप्त केले असून त्याचमुळे त्यांनी या संदर्भात नेमक्या कुठल्या आधारावर बालसंगोपन रजा मंजूर अथवा नामंजूर करण्यात येते या संदर्भातील कागदपत्रे तसेच त्यांचा अर्ज महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २३/०७/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकातील कुठल्या कारणांमुळे नामंजूर करण्यात आलेला आहे याबाबतीत काहीच न कळविल्यामुळे तसेच **जोडपत्र अ** ला देखील विहीत मदतीत कुठलाच प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिल अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी मागितलेली माहिती ही याआधीच शासनातर्फे संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली असली तरी संबंधित शिक्षण संस्थेने उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने त्यांच्या संस्थेत कार्यरत श्रीमती तृप्ती धोंडे या चलन वलन अवयव निर्देशिका (mobility instructor) या पदावर कार्यरत असून त्यांचा बालसंगोपन रजा अर्ज, त्याची हाताळणी व त्याबाबत घेतलेला अंतिम निर्णय या संदर्भातील सर्व कागदपत्रे या संदर्भात प्रचलित शासकीय नियम व या प्रकरणात नेमक्या कुठल्या तरतुदीनुसार उपरोक्त निर्णय घेण्यात आला आहे हे प्राधिकरण म्हणून सम्यक पद्धतीने निर्णय प्रक्रिया घेणे अपेक्षित आहे.

या संदर्भातील **कलम २ (च)** प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे तसेच अपिलार्थीचे जोडपत्रामधील नमूद सर्व कागदपत्रे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक कमला मेहता अंध हायस्कूल, दादर (पूर्व), मुंबई यांनी उपरोक्त आदेश प्राप्त होताच **दोन आठवड्याच्या आत अपिलार्थींना विनामूल्य** प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

Jyotsna